**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय**
" वनभवन " रामगिरी मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर-440 001
तिसरा माळा, "ए" -विंग, दूरध्वनी क्र.0712-2550670, E-mail ID- pccfhoff@gmail.com

**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कर्मिक),म.रा. नागपूर यांचे कार्यालय**
" वनभवन " रामगिरी मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर-440 001
तिसरा माळा, "बी" -विंग, दूरध्वनी क्र.0712-2556791, E-mail ID- apccfper@mahaforest.gov.in

क्रमांक : मवसे/मुले/संकीर्ण/१८-१९/ ६९२ /कक्ष-९
नागपूर ४४०००१, दिनांक : 25/5/2018

## परिपत्रक

**विषय:-** वन विभागातील क्षेत्रीय व कार्यालयीन कर्मचारी/ अधिका-यांनी आस्थापनाविषयक बाबीसंबंधी पत्र व्यवहार करतांना अनुसरावयाचे कार्यपध्दतीबाबत.

या कार्यालयाचे असे निदर्शनास आले आहे की, वन विभागातील क्षेत्रीय व कार्यालयीन कर्मचारी/अधिकारी त्यांच्या नियतकालीक बदली अर्ज तसेच कौटूंबिक अडचणीस्तव बदली बाबतचे विनंती अर्ज किंवा आस्थापना विषयक बाबी संबंधी अर्ज त्यांचे नियंत्रक अधिकारी किंवा सक्षम प्राधिकरणाशिवाय आगाउु प्रतिमध्ये अथवा प्रतिलिपीचे स्वरुपात शासनाकडे तसेच लोकप्रतिनिधी यांचेकडे पाठवितात. यामुळे शासनाचा तसेच लोकप्रतिनिधी यांचा विनाकारण वेळेचा व कागदांचा अपव्यय होतो आणि प्रशासनात नियंत्रणाचा अभाव दिसुन येतो. ही बाब नियमबाहय असून प्रशासकिय दृष्टया योग्य नाही. म्हणून सदर वृत्तीवर आळा घालण्यासाठी व प्रशासनिक शिस्त ठेवण्यासाठी खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यांत येत आहेत :

1. वन विभागातील क्षेत्रीय व कार्यालयीन कर्मचारी / अधिकारी यांनी त्यांच्या बदली साठीचे विनंती अर्ज किंवा आस्थापना विषयक बाबी संबंधी चे विनंती अर्ज, त्यांचे नियंत्रक अधिका-यांमार्फतच सादर करावेत. आगावू प्रत फक्त नियंत्रक अधिका-यांचे वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करावी.
2. नियंत्रक अधिका-यांनी सबंधितांचे अर्ज त्यांचे निकटतम वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करावेत.
3. वनविभागातील कोणत्याही अधिका-यांनी/कर्मचा-यांनी थेट या कार्यालयाकडे किंवा शासनाकडे अर्ज करु नयेत.
4. ज्या प्रकरणी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वबप्र) म.रा.नागपूर यांचे कार्यालयाकडे संबधितांचे अर्ज पाठविणे आवश्यक आहे, त्या प्रकरणातच अर्ज संबधित कार्यालयाने प्रधान मुख्य वनसंरक्षक (वबप्र) म.रा.नागपूर यांचेकडे सादर करावेत.

२.०० वरील सुचनांचे पालन सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी करावे. तसे करतांना खालील तक्यात दिलेल्या कार्यालयांकडेच अर्ज पाठवावेत. सक्षम प्राधिकरणाशिवाय अन्य यंत्रणेकडे किंवा लोकप्रतिनिधींकडे अर्ज करु नयेत किंवा त्याच्या प्रतिलिपी सुध्दा पाठवू नयेत. त्याबरोबरच प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय किंवा शासनाकडे सुध्दा अनावश्यक प्रतिलिपी किंवा आगाउु प्रत पाठवू नयेत.

| संवर्ग | नियंत्रक अधिकारी | नियंत्रक अधिका-यांचे वरिष्ठ अधिकारी | अंतीम वरिष्ठतम कार्यालय |
|---|---|---|---|
| वनरक्षक | वनपरिक्षेत्र अधिकारी | उपवनसंरक्षक | मुख्य वनसंरक्षक |
| वनपाल | वनपरिक्षेत्र अधिकारी | उपवनसंरक्षक | मुख्य वनसंरक्षक |
| वनक्षेत्रपाल | उपवनसंरक्षक | मुख्य वनसंरक्षक | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशा. दु. संवर्ग) नागपूर |
| सहा. वनसंरक्षक | उपवनसंरक्षक | मुख्य वनसंरक्षक | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक) नागपूर |
| विभा. वन अधि | मुख्य वनसंरक्षक | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक) | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वबप्र) म.रा.नागपूर |

३.०० वरील सुचनांचे पालन न करता सबंधितांचे अर्ज किंवा त्या अर्जाच्या प्रतिलिपी इतर कार्यालयाकडे प्राप्त झाल्यास ही बाब महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ चे उल्लघंन समजण्यांत येऊन नियमानुसार कार्यवाही करण्यांत येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी. हया निर्देशाचे पालन करण्याबाबत नियंत्रक अधिका-यांनी त्यांचे अधिनस्थ सर्व अधिकारी/कर्मचारी यांना सुचना द्याव्यात व त्याप्रमाणे अंमलबजावणी करावी.

४.०० या परिपत्रकातील सुचना हया वरील तक्यात नमुद संवर्गातील सर्व अधिकारी/कर्मचारी तसेच कार्यालयीन कर्मचारी /अधिकारी यांना लागु राहतील.

**(यु.के. अग्रवाल ),**
**प्रधान मुख्य वनसंरक्षक**
**(वन बल प्रमुख , म .रा.नागपूर**

**प्रति,**
मुख्य वनसंरक्षक (प्रा)(सर्व)
मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) (सर्व)
वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण (सर्व)
उपवनसंरक्षक (सर्व)

**प्रतिलिपी**:- प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना माहितीसाठी सस्नेह अग्रेषित
**प्रतिलिपी**:- प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामा.वनि) महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीसाठी सस्नेह अग्रेषित
**प्रतिलिपी**:- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना माहितीसाठी अग्रेषित
**प्रतिलिपी**:- पालक अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित.